# मुकुल माधव फाउंडेशनतर्फे आदिवासी भागात शौचालयांची उभारणी

शौचालयाअभावी आदिवासींची होणारी परवड थांबविण्यासाठी मुकुल माधव फाउंडेशन आणि फिनोलेक्सकडून पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागात एकूण २०९ शौचालयांची उभारणी करण्यात आली आहे. त्यातील चौथ्या टप्प्यात वाडा तालुक्यातील केळठान सापने व कारळगाव येथे ७७ शौचालयांचे व सोलर पंपांचे उद्‌घाटन झाले. स्वच्छतेसाठी बकेट, मग आणि सफाईचे साहित्यही देण्यात आले. गटविकास अधिकारी राजलक्ष्मी येरपुडे, सरपंच म्हात्रे, बबलू मोकळे, मंगेश तळेकर उपस्थित होते. खैरवाडी सोशल वेल्फेअर असोसिएशनच्या सहकार्याने पालघर जिल्ह्यातील विविध गावांमध्ये शौचालये बांधली आहेत. याआधी वाडा तालुक्यातील सोनाळे येथे ५० शौचालये, सौरदिवे बसविण्यात आले, अशी माहिती मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया यांनी दिली.




सकाळ